म.वि.प्र.समाजाचे,

# कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

# उत्तमनगर, सिडको, नाशिक

# राष्ट्रीय सेवा योजना २०२२-२०२३

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## दि.०८/०२/२०२३

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल पहिल्या दिवशी सकाळ सत्रात उदघाटन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. उद्धाटन कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा.श्री. शिवाजीराव गडाख, उद्धाटक म्हणून मा.ॲड. लक्ष्मणराव लांडगे, संचालक, म.वि.प्र.समाज, नाशिक, माजी संचालक, म.वि.प्र.समाज नाशिक प्रमुख अतिथी पुंडलिक नाना थेटे गावाचे सरपंच श्री.किरण कोरडे, कार्यक्रमासाठी उपसरपंच श्री. संजय थेटे, सदस्य तानाजी गायकर, जेष्ठ समाज सेवक श्री.निवृत्ती घुले महविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.के.कुशारे, मुख्याधापक श्री.यु.डी.बस्ते, स्टाफ सेक्रेटरी प्रा.एस.टी. घुले डॉ.रविराज वटणे आदी उपस्थित होते.







कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिडको महविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.के.कुशारे यांनी केले. मा.श्री. शिवाजीराव गडाख यांनी आपले अध्यक्षीय भाषण करत सर्वांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रविंद्र आहिरे यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे, प्रा. शुभम गव्हाणे यांनी प्रयत्न केले.

दुपारच्या सत्रात शिबिरार्थी विद्यार्थ्यांना शिबिराची रूपरेषा सांगून शिबिरातील कामकाजाचे नियोजन करून विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात आले.

## दि: ०९/०२/२०२३

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नियमित पद्धतीने प्रार्थना घेण्यात आली त्या विद्यापीठ गीत, रा.से.यो. गीत, इतर प्रार्थना घेण्यात आल्या. सिडको महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने गिरणारे गावचे इतिहास लेखन करण्यासाठी प्रा.मिलिंद थोरात सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व्हे करण्यात आला.







दुपारच्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून आलेल्या मा.श्री. राम खुर्दळ, अध्यक्ष शिवकार्य गडकोट संवर्धन संवर्धन संस्था यांनी **शिवरायांचे दुर्गसाम्राज्य व आपण** या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

# दि. १०/०२/२०२३

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. गिरणारे येथील केबीएच विद्यालय येथील संपूर्ण परिसराची स्वच्छता स्वयंसेवकाकडून करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने  यांनी गावातील आर्थिक व सामाजिक सर्व्हे करण्यात आला.






दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून आलेल्या मा.ॲड. समीर शिंदे, अध्यक्ष नाशिक जिल्हा अंधश्रद्धा निर्मुलन समिती यांनी **अंधश्रद्धा निर्मुलन एक विज्ञानिक दृष्टीकोन** याविषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# दि. ११/०२/२०२३

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. गिरणारे येथील ऐतिहासिक बारव याची स्वच्छता करण्यात आली तसेच

गावातील स्मशान भूमीची स्वच्छता करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने गावातील लोकांच्या कुटुंबांचे आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले तसेच सिडको महाविद्यालयाच्या वनस्पती विभागाच्या वतीने गावातील जैविविधतेचे सर्वेक्षण करण्यात आले.






दुपारच्या सत्रात व्याख्याते महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ रविराज वटणे यांनी उपस्थितांना '**युवकांची नैतिक सामाजिक जबाबदारी** व या विषयावर मार्गदर्शन केले.

# दि. १२/०२/२०२३

शिबिरातील पाचव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन गिरणारे येथील खंडेराव महाराज टेकडी परिसराची स्वच्छता करण्यात आली. याच दिवशी सिडको महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने गावातील ग्रामस्थांसाठी **मोफत शर्करा तपासणी शिबीर** ठेवण्यात आले होते. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला





दुपारच्या सत्रात व्याख्याते गिरणारे गावाचे सुप्रसिद्ध वादक मा.श्री.प्रमोद चालक यांनी **'भारतीय विविध वादन कला कौशल्य '** या विषयावर प्रात्यक्षिक दाखवून उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. तसेच विभाग समन्वयक डॉ.गोरक्षनाथ पिंगळे यांनी शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## दि. १३/०२/२०२३

शिबिरातील सहाव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर गिरणारे येथील मरेथोन चौकातील स्वच्छता करण्यात आली.तसेच पथनाट्याची रंगीत तालीम घेण्यात आली.






दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून विविध विषयांवर कलाविष्कार दाखविण्यात आले.

## दि. १४/०२/२०२३

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या शेवटच्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना झाल्यानंतर समर्थ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली अभियानांतर्गत गाव हद्दीतील परिसरामध्ये रॅली काढण्यात आली. त्या वेगवेगळ्या घोषणा देत स्वयंसेवकांनी विविध सामाजिक विषयावर जनजागृती करण्याचा प्रयत्न केला तसेच गावहद्दीतील मातोश्री नगर व राजवाडा परिसरात सिडको महाविद्यालयाच्या वतीने पथनाट्य, महाविद्यालयाच्या वतीने विविध विषयांवर पथनाट्ये सादर करण्यात आले.







दुपारच्या सत्रात शिबिराचा समारोप संपन्न झाला त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.ॲड.नितीन ठाकरे, सरचिटणीस, म.वि.प्र.समाज, नाशिक, माजी संचालक, म.वि.प्र.समाज नाशिक प्रमुख अतिथी पुंडलिक नाना थेटे महाविद्यालयाचे श्री.किरण कोरडे, कार्यक्रमासाठी उपसरपंच श्री. संजय थेटे, सदस्य तानाजी गायकर, जेष्ठ समाज सेवक श्री.निवृत्ती घुले महविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.के.कुशारे, मुख्याधापक श्री.यु.डी.बस्ते, स्टाफ सेक्रेटरी प्रा.एस.टी. घुले डॉ.रविराज वटणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. एस.टी.घुले यांनी तर प्रास्ताविक डॉ. रविंद्र आहिरे यांनी केले स्वयंसेवकामधून महाविद्यालयाच्या स्वयंसेवक यांनी आपले अनुभव व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांनी आपले मार्गदर्शन केल्यानंतर ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने सदस्य तानाजी गायकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शिबिरात झालेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. अध्यक्षीय भाषणात मा.ॲड.नितीन ठाकरे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम गव्हाणे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न केला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे यांनी प्रयत्न केले. सातदिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उत्तमरीत्या व यशस्वीपणे पूर्ण केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.के.कुशारे यांचे मार्गदर्शन लाभले.

**(डॉ. रविंद्र आहिरे )**
**कार्यक्रम अधिकारी**

**(डॉ.एस.के.कुशारे)**
**प्राचार्य**